**<u>स्पेशल मुकदमा क्र.३१६/२०१७</u>**

अशोक हरी उर्फ हरीभाउ मढवी
वि.
कमल बच्चा अली व इतर

**<u>आदेश निशाणी क्र.२६ वर</u>**

१. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) प्रमाणे दावा फेटाळणेसाठी प्रतिवादी क्र.२/१ यांनी सादर केला आहे. अर्ज, म्हणणे निशाणी २८, दावा व वादीने सादर केलेले कागदपत्र वाचले. वादी व प्रतिवादी क्र.२/१ यांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२/१ यांचे विद्वान वकीलांनी सादर केलेले मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचेकडील न्यायनिर्णयांच्या छायांकीतप्रती वाचले.

२. अर्जकथन थोडक्यात असे आहे की, दावा दाखल करणेस कारण घडलेले नाही. दिनांक २९-१२-२०१५ रोजीचा भूखंड विक्री करारनामा यातील पक्षकार श्रीकांत ढोले यांस पक्षकार केलेले नाही. तसेच वादीने भूखंड मिळकतीचा कब्जा मिळावा अशी विनंती केलेली नाही. त्यामुळे वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

३. वादीने निशाणी २८ यावर म्हणणे सादर केले आहे. अर्जकथन संपूर्णपणे नाकारले आहे. दावा भूखंडाचा कब्जा प्रतिवादी क्र.१ व २ यांना दिलेला नाही. अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावर निष्कर्ष

व कारणमीमांसा नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) प्रमाणे दावा फेटाळण्यास पात्र आहे का? | .....नाही. |
| २. | आदेश काय? | ...आदेशाप्रमाणे. |

:: **<u>कारणमीमांसा</u>** ::

**<u>मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने</u>**. :-

५. प्रतिवादी क्र.२/१ च्या विद्वान वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचेकडील पुढील न्यायनिर्णयातील गुणोत्तराचा आधार घेतला आहे.

(१) Rajendra Bajoria & others Vs. Hemant Kumar Jalan & others, Supreme Court Civil Appeal Nos. 5819-5822 of 2021.

(२) Raghwendra Sharan Singh Vs. Ram Prasanna Singh (Dead) By by LRs., Supreme Court Civil Appeal Nos. 2960 of 2019.

(३) The Church Charitable Trust & Educational Charitable Society represented by its Chairman Vs. Ponniamman Educational Trust represented by its Chairperson/ Managing Trustee, Supreme Court Civil Appeal Nos. 4841 of 2012.

वरील न्यायनिर्णय वाचले. दिवाणी प्रक्रिया संहिता

आदेश ७ नियम ११ प्रमाणे दावा फेटाळण्यास पात्र आहे का, याची तपासणी करण्यासाठी वादीचे दावा कथन व विसंबून असलेले कागदपत्र हेच केवळ विचारात घेणे आवश्यक आहे. प्रतिवादीचा बचाव व कागदपत्रे विचारात घेता येत नाहीत.

६. प्रस्तुत दावा दिनांक ०३-०१-२०१७ रोजीचा त्रिपक्षीय करारनामा व दिनांक २३-०१-२०१६ रोजीचा विकसन करारनामा रद्द करणे व निरंतर मनाई आदेश मिळणेसाठी सादर केलेला आहे. निशाणी १ दावा कथन संपूर्णपणे वाचले. दावा मिळकत भूखंड मिळकतीबाबत दिनांक २३-०१-२०१६ रोजीचे विकसन करार व दिनांक ०३-०१-२०१७ रोजीचा त्रिपक्षीय करारनामा हे वादी व प्रतिवादी क्र.३ ते ६ यांना फसवून करणेत आले आहेत यासंबंधी दावा दाखल करण्यास कारण स्पष्टपणे नमूद केले आहे.

७. श्रीकांत ढोले याचे सोबतचे दिनांक २९-१२-२०१५ रोजीचे करारासंबंधी वादकथन नाही. श्रीकांत ढोले यांची उपस्थिती दाव्याचे परिणामकारकपणे व अंतिमतः निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे असे दावा कथनावरून दिसत नाही. त्यामुळे या टप्प्यावर श्रीकांत ढोले आवश्यक पक्षकार आहेत असे म्हणता येत नाही.

८. दावा भूखंडाचा कब्जा प्रतिवादी क्र.२ यांस देण्यात आलेला आहे असे वादकथन नाही. दावा भूखंडासंबंधी दिनांक २३-०१-२०१६ रोजीचा विकसन करारनामा व दिनांक ०३-०१-२०१७ रोजीचा त्रिपक्षीय करारनामा रद्द करण्याची विनंती स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट कलम ३१ प्रमाणे वादीने केलेली आहे. स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट कलम ३४ प्रमाणे हक्कासंबंधी जाहिर ठराव मिळणेची विनंती नाही. त्यामुळे स्पेसिफीक रिलीफ

ॲक्ट कलम ३४ चे परंतुकाप्रमाणे कब्जासंबंधी अनुतोष/विनंती मागणी केलेली नाही. या कारणास्तव दावा बाधीत होत नाही.

९. दावा कथन वाचले असता वादीस दावा दाखल करण्यास कारण घडलेले आहे. तसेच स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे तरतूदीप्रमाणे दावा बाधीत झालेला आहे असे दिसत नाही. त्यामुळे दावा फेटाळण्यास पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून पुढील आदेश पारीत करीत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

पनवेल,
दिनांक : १७-०९-२०२२.

(के.एम.सोनवणे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरीष्ठ स्तर पनवेल.